# Library & Information Centre

## GIT NEWS

**Tarun Bharat 28-04-2016**



# जीआयटी सुरू करणार दोन नवे अभ्यासक्रम

बेळगाव : कर्नाटक लॉ सोसायटीच्या जीआयटी कॉलेजच्यावतीने इंडस्ट्रियल इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट तसेच ऑटोमोटिव्ह इलेक्ट्रॉनिक्स या दोन नव्या अभ्यासक्रमांना सुरुवात केली जाणार आहे. हे दोन्ही अभ्यासक्रम उद्योगधंद्याशी सलग्न असणार आहेत.

एमटेक या पदवी अंतर्गत या अभ्यासक्रमाचा समावेश असेल. सध्याच्या परिस्थितीत उद्योगधंद्यामध्ये या विषयातील तज्ज्ञांची गरज ओळखून हे दोन वर्षे अभ्यासक्रम चालविले जाणार असून याला विश्वेश्वरय्या तांत्रिक विद्यापीठाचेच प्रमाणपत्र दिले जाणार आहे. याची नोंद विद्यार्थ्यांनी घ्यावी. अधिक माहितीसाठी deanacad@git.edu या इमेलवर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले.

# LIBRARY & INFORMATION CENTRE

**Tarun Bharat 28-04-2016**

# जीआयटीतर्फे आरोहण युवा महोत्सव संपन्न



बेळगाव : प्रा. डॉ. आनंद देशपांडे, मेघा शहा, रेणू कुलकर्णी, सुनीता हणमशेट, प्रकाश मिर्जी, चेतन कुलकर्णी व सहभागी विद्यार्थी.

प्रतिनिधी
बेळगाव

इनरव्हील क्लब, इ-क्लब ३१७० आणि जीआयटी कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने आरोहण हा युवा महोत्सव नुकताच पार पडला. प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य डॉ. आनंद देशपांडे उपस्थित होते.

रोटेरीयन प्रकाश मिर्जे यांनी स्वागत केले. चेतन कुलकर्णी यांनी युवा महोत्सवातील आरोहण आयोजनाचे महत्त्व सांगितले. अध्यक्षस्थानी सुनीता हणमशेट होत्या. डिजिटलायझेशन इज द की टू ट्रान्स्फर्मेशन हा या महोत्सवाचा मुख्य उद्देश होता. तब्बल १५ महाविद्यालयांच्या १५० हून अधिक विद्यार्थ्यांनी आरोहण या युवा महोत्सवात सहभाग घेतला होता. सहभागी विद्यार्थ्यांमधून विविध स्पर्धा घेण्यात आल्या. मंजिरी पाटील, चैतन्य कुलकर्णी, लता कित्तूर, सोनल धामणकर, विनय कुलकर्णी आदींनी परीक्षक म्हणून काम पाहिले.

विजेत्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षिसे वितरित करण्यात आली. मेघा शहा यांनी आभार मानले.